ISSN 2231-1629 Knowledge Resonance
A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal
IMPACT FACTOR 8.072

# भारतातील सामाजीक उत्तरदायित्वाच्या दृष्टिकोनातून पर्यावरणाचा शाश्वत विकास

**Mahadeo Rambhau Sadawarte**
*Assistant Professor*
*Kewalramji Harde Mahavidyalaya, Chamorshi.Dist-Gadchiroli*

***सारांश***

*विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे असा सतत चालणारा विकास साधत असताना मानवाने नैसर्गिक संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. पर्यावरण संरक्षण व मानवी जीवन एकमेकांना पूरक आहे याची जाणीव होऊन शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरण संरक्षण दृष्टिकोनातून स्पष्ट करण्यात आली. "जो विकास चालू पिढीच्या गरजा व पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो अशा विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात". शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरण महत्त्व देणारी आहे. यामध्ये मानवी गरजा, आर्थिक वाढीचे एकात्मीकरण, पर्यावरण आरोग्य व निरंतर आर्थिक विकास केंद्रस्थानी असतो. पर्यावरण व विकास आयोगाद्वारे १९८७ पासून शाश्वत विकासाची संकल्पनाचा उगम होऊन पर्यावरण संरक्षणातून त्याचा विकास होत आहे. शाश्वत विकासामध्ये मानवाच्या सध्याच्या व भावी गरजा भागविता असताना निसर्गाला कोणताही धक्का न लावता आर्थिक विकास साधला जातो. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास व शाश्वत विकासाची तत्वे स्वीकारून नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करून जलद आर्थिक विकासाचा मार्ग स्विकारणे व मूलभूत बाबींवर भर देणे ही काळाची गरज आहे.*

**प्रस्तावना**

आर्थिक विकास व पर्यावरण यांचे नाते नवीन नाही ज्याप्रमाणे पर्यावरणीय अवनती आणि आर्थिक क्रिया यांच्या मधील उकल होत गेली त्याचप्रमाणे पर्यावरण माध्यमातून मैत्रीपूर्ण आर्थिक विकासावर भर दिला. पर्यावरण संरक्षण आणि मानव वंशाचे कल्याणकारी जीवन एकमेकांच्या विरोधात नाही तर एकमेकास पूरक आहे याची जाणीव होऊ लागली म्हणून चिरस्थायी विकासाची संकल्पना पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत करण्यात आली. पर्यावरण सहयोगी घटकातून मानवाने या जीवन पद्धतीचा अंगिकार करून आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला.

**शाश्वत विकास संकल्पनेचा उगम**

जागतिक पर्यावरण व विकास आयोग (World commission on environment & development) ची स्थापना १९८३ साली करण्यात आली. १९८४मध्ये हा आयोग संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत याची स्वतंत्र संस्था म्हणून कार्य करू लागला. हा आयोग पृथ्वीवरील सामाजिक पर्यावरणीय समस्यांचे निरीक्षण करून त्यावर वास्तववादी उपाय योजनासाठी आणि पृथ्वीवरील संसाधने पुढील पिढ्यांसाठी राखून त्यांचा उपयोग चालू पिढीसाठी शाश्वतरित्या कसा करता येईल, यासाठी उपाययोजना शोधण्यासाठी नेमण्यात आला होता. या आयोगाचे अध्यक्ष नॉर्वेचे पंतप्रधान ग्रो हारलेम ब्रुंन्डलँड ह्या होत्या. त्यावरुन या आयोगांना बँडलँड आयोग असे म्हणतात. या आयोगाने सादर केलेल्या या अहवालात शाश्वत विकास ही संकल्पना व तिची व्याख्या सर्व प्रथम मांडण्यात आली हीच व्याख्या सर्वमान्य मानले जाते.

**शाश्वत विकासाची व्याख्या**

जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो त्या विकासास शाश्वत विकास असे म्हणतात.-- पर्यावरण आणि विकास, जागतिक ब्रुंन्डलँड आयोग १९८७

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१.शाश्वत विकासाकरिता पर्यावरणाचा अभ्यास करणे.
२.शाश्वत विकासासाठी उपयोजनाचा अभ्यास करणे.
३.भारतातील शाश्वत विकासाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती-**

प्रस्तुत अभ्यासासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला असून यामध्ये संदर्भग्रंथ, शोधनिबंध, मासिकाचे व इंटरनेटचा अभ्यास करून सविस्तररीत्या अभ्यास केला आहे.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टे-**

1.विकासाचे पुनरुज्जीवन.
2.विकासाचा दर्जा सुधारणे.
3.रोजगार, अन्न, ऊर्जा, पाणी आणि स्वच्छता या बाबतीत गरजा पूर्ण करणे.
4. संसाधनाचे संरक्षण व संवर्धन

५.तंत्रज्ञानाचा वापर

६.निर्णय प्रक्रियेमध्ये पर्यावरण व अर्थशास्त्राचा समावेश करणे.

**भारतातील पर्यावरणाची शाश्वत विकासाची सद्यस्थिती-प्रतिनिधिक उदाहरणे**

शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत दोन्ही संकल्पना चा एकत्रित विचार केला जातो. भारतात १९९१ मध्ये पर्यावरण्याच्यादृष्टीने शाश्वत विकास करण्यासाठी वातावरणातील हवेची गुणवत्ता टिकून ठेवण्यासाठी हवा प्रदूषण नियंत्रण कायदा अस्तित्वात आणला. १९८६ मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा -संयुक्तराष्ट्र परिषदेत पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने पर्यावरण संरक्षण कायदा अस्तित्वात आणला. १९७४ मध्ये पर्यावरण संरक्षण व सार्वजनिक आरोग्याच्या हीताने भारत सरकारने जल प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा केला. १९७२ मध्ये केंद्र सरकारने पर्यावरण आणि वन विभागाला वन्यजीव संरक्षण कायदा अधिकार प्रदान करण्यात आला. अजेन्डा २१ नुसार ब्रँडलँड आयोगाने शाश्वत विकासासाठी सांगितलेल्या शिफारशीचा योग्य पाठपुरावा पाठपुरावा करण्यासाठी शाश्वत विकास आयोग स्थापन करण्यात आला. आयोग संयुक्त राष्ट्राच्या पर्यावरण व विकास कामांचे समन्वय करतो.

शासकीय प्रयत्नाबरोबरच अशासकीय संघटनांनी प्रयत्न केलेले आहेत. ज्यामध्ये आगाखान ग्रामीण मदत कार्यक्रम, विक्रम साराभाई विकास व अन्योन्य क्रिया केंद्र आणि भारतीय उद्योग प्रतिष्ठान सारख्या अशासकीय संघटनांनी शाश्वत विकासासाठी खालील काही महत्त्वाची उदाहरणे व प्रयत्न केलेले आहेत. चिपको आंदोलन ही भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना आहे. सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली वृक्षतोड विरोधात केलेले फार मोठे आंदोलन होते. राळेगणसिद्धीत (जिल्हा अहमदनगर- महाराष्ट्र) श्री अण्णा हजारे यांनी ग्रामस्थांच्या सामुदायिक सहभागातून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेऊन जलसंवर्धन, पडीक जमिनीचा वापर आणि जलसिंचन क्षेत्रात वाढ करून संपूर्ण गावाचा कायापालट केला. शाश्वत विकासाचे अनुकरणीय असा आदर्श नमुना आहे. सामुदायिक प्रयत्नातून शाश्वत विकास व पर्यावरणाचे संरक्षण कसे साधता येते याचे दुसरे उत्तम उदाहरण म्हणजे राजस्थान मधील अलवार जिल्ह्यातील भाऊता कोल्याला हे खेडे होय. केवळ १० वर्षात सामुदायिक भूमिकेतून राजेंद्रसिंग यांनी २५ विहिरी, तलाव, बंधारे इत्यादीची निर्मिती करून वाळवंट असलेल्या गावाला आज नंदनवनाचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. हे घडले ते केवळ आणि केवळ सामुदायिक भूमिकेतून झालेले आहे. श्रीमती मेघा पाटणकर यांनी नर्मदा बचाव अभियान गेल्या कित्येक वर्षापासून चालविले जात आहे. गुजरात, मध्य प्रदेश व महाराष्ट्रातील मोठे वनक्षत्र सरदार सरोवराच्या पाण्याखाली जाणार आहे. त्यामुळे पर्यावरणाची अवनती होणार आहे ते टाळण्यासाठी आंदोलन चालू आहे.

वरील उदाहरणावरून असे लक्षात येते की, भारतातील शाश्वत विकासासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न होत आहेत परंतु त्यासाठी राजकीय व प्रशासकीय इच्छाशक्तीची, जाणीव जागृतीची व सामुदायिक भूमिकेची गरज आहे. भारतामध्ये शाश्वत विकासाच्या संदर्भात अनेक दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातात परंतु सामुदायिक भूमिकेतून प्रयत्न जास्त केले जावे. त्यासाठी मानवी दृष्टिकोन, कल्याणकारी विचार, कौशल्य आणि प्रशिक्षण यामध्ये परिवर्तन अपेक्षित आहे. यासाठी पर्यावरण शिक्षण हा शिक्षणाचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. राजकीय इच्छाशक्ती, लवचिक व गतिशील धोरणे आणि उचित तंत्रज्ञानाची निवड या आधारे शाश्वत विकास व पर्यावरणाच्या संरक्षणा चे ध्येय गाठता येईल. त्याचबरोबर पुढील काही उपाय योजनांच्या माध्यमातून शाश्वत विकास आणि पर्यावरणा च्या संरक्षणाचे उद्दिष्टे काढता येऊ शकते.

१.लोकसंख्यावरील नियंत्रण संबंधित कायद्याची कड्क अंमलबजावणी करणे.

२.पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे त्यासाठी लोकशिक्षण देणे.

३. वृक्षलागवड प्रत्येक व्यक्तीला अनिवार्य करावी.

४. स्वयंचलित वाहनांची देखभाल करावी. वाहनावर प्रदूषण कर आकारावा.

५. वाढत्या नागरीकरणामुळे व बदलत्या जीवनशैलीमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. म्हणून कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी.

६. भावी पिढीच्या कल्याणाचा विचार करून नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करावा.

७. विकासाच्या योजना, धोरणात्मक निर्णय आणि मानवी दृष्टिकोन यांचा न्याय तत्वावर मांडणी करावी.
८.निसर्गापासून मनुष्य दूर गेला आहे. त्याला निसर्गाकडे आकर्षित केले पाहिजे.
९. शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे संरक्षणासाठी सामुदायिक भूमिकेतून कार्य करण्यामध्ये वाढ केली पाहिजे.

**सारांश**

शाश्वत विकासाची तत्वे अंगीकारणे भारतासारख्या विकसनशील देशाला अत्यावश्यक आहे. भारताची पारंपारिक कृषिप्रधान अर्थव्यवस्था विकसित देशाप्रमाणे जलद आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारू लागली आहे. त्यातून होणारा संसाधनाचा ऱ्हास हा देशातील नैसर्गिक परिसंस्था ऱ्हास होण्यास कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करून आर्थिक विकास साधण्यासाठी अशाश्वत विकासाकडून शाश्वत विकास साध्य करणे गरजेचे आहे .

**संदर्भ ग्रंथ**

*१. डॉ.झांबरे जी. एन, भारतीय अर्थशास्त्र, विकास व पर्यावरण, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर,२००४*
*२. शेलकर अभया, 'पर्यावरण संरक्षण कायदा', नाशिक लॉ हाऊस औरंगाबाद, २००४.*
*३. Kumar A, 'Environmental science', APH public service company, New Delhi, 2009.*
*४. www.environmentalpollushan.com*
*५. http//www.sustainabledevelopment.com*